## दिन विशेष...

१५२४ : पोर्तुगीज खलाशी व भारताचा शोध लावणारा दर्यावर्दी वास्को-द-गामा यांचा मृत्यू झाला.

१८९९ : साने गुरुजी यांचा जन्मदिन.

१८१८ : शक्तीच्या अविनाशित्वाचा शोध लावणारा संशोधक जेम्स प्रिस्कॉट ज्यूल यांचा जन्म झाला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८५,५२४.८४ -४२.६३ (०.०५०%)
डॉलर ₹ ८९.६०

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १३ |
| दिल्ली | २१ | ११ |
| मुंबई | ३४ | १८ |
| नागपूर | २८ | ११ |
| पुणे | ३० | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४५ | किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

यशस्वी होण्यासाठी आत्मशिस्त आणि नियमितता महत्त्वाची आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०२ संध्या-५:५३

### सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,४७५/- २,२३,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### भारतानं युद्धासाठी तयार रहावं

मुंबई । दहशतवाद रोखण्यासाठी शेजारी राष्ट्रांबरोबर असलेल्या प्रादेशिक वादाच्या पार्श्वभूमीवर भारताने उच्च तीव्रतेचे अल्पकालीन आणि दीर्घकालीन युद्धासाठी नेहमी तयार असले पाहिजे, असे विधान भारताच्या संरक्षण दलाचे प्रमुख अनिल चौहान यांनी केले. आशियातील सर्वात मोठ्या तंत्रज्ञान महोत्सवांपैकी एक असलेल्या आयआयटी मुंबईच्या टेकफेस्टमध्ये बोलताना त्यांनी भविष्यातील बदलते युद्धांचे स्वरूप, तंत्रज्ञान आणि सामरिक दृष्टीकोनावर भाष्य केले.

### विराट कोहलीच्या सामन्याचं ठिकाण बदललं!

मुंबई । येत्या २४ डिसेंबरपासून विजय हजारे ट्रॉफीला सुरूवात होणार आहे. या स्पर्धेचं सर्वात मोठं आकर्षण म्हणजे विराट कोहली आणि रोहित शर्मासारखे दिग्गज खेळाडू ही स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. हा सामना बंगळूरूत एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जाणार होता. पण कर्नाटक सरकारच्या सुचनेनुसार, बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सामने खेळवले जाणार आहेत.

### ८० लाख रुपये किमतीची व्हेल माशाची उलटी जप्त

मुंबई । व्हेल माशाच्या उलटीची (अंबरग्रीस) विक्री करण्यासाठी आलेल्या एका आरोपीला कुर्ला पोलिसांनी अटक केली. या आरोपीच्या ताब्यातून ८० लाख रुपये किमतीची व्हेल माशाची उलटी जप्त करण्यात आली असून या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. खोल समुद्रात आढळणाऱ्या व्हेल माशाच्या उलटीचा वापर (अंबर ग्रीस) औषधनिर्मिती व सुगंधी अत्तर तयार करण्यासाठी करण्यात येतो. त्यामुळे या माशाच्या उलटीला बाजारात मोठी मागणी आहे.

# जळगाव महापालिकेसाठी पहिल्याच दिवशी ७७७ उमेदवारी अर्जांची विक्री!

## महापालिका परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त; इच्छुकांमध्ये दिसून आला मोठा उत्साह

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील महानगरपालिकेच्या निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज विक्रीसह दाखल करण्याच्या प्रक्रियेला मंगळवारपासून सुरुवात करण्यात आली. त्यामुळे इच्छुंकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली ना हरकत प्रमाणपत्रे तसेच थकबाकीदार नसल्याचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी महापालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयांमध्ये मोठी लगबग होती. परंतु अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी ७७७ अर्जांची विक्री झाली. यामुळे महापालिका निवडणुकीत इच्छुंकामध्ये मोठा उत्साह दिसून आला.**

निवडणूक आयोगाकडून राज्यातील मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाण्यासह २९ महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. ज्यामध्ये जळगाव महापालिकेचाही समावेश आहे. १५ जानेवारीला महापालिकेसाठी मतदान पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेतील पहिला टप्पा मंगळवारी (ता.२३) रोजी सुरू झाल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण(पान २ वर)



### ➤ पहिल्याच दिवशी ७७७ अर्जांची विक्री

यंदाच्या निवडणूकीत इच्छुक उमेदवारांची मोठी संख्या दिसून येत असून उमेदवारी अर्ज घेण्याच्या पहिल्या दिवशीच दिवसभरात तब्बल ७७७ अर्ज इच्छुक उमेदवारांनी घेतले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. या आकड्यामुळे उमेदवारांची चढाओढ किती तीव्र आहे, याचे चित्र दिसून येत असून इतक्या मोठ्या संख्येने अर्ज घेण्यात आल्याने आगामी काही दिवसांत नामनिर्देशन प्रक्रियेत आणखी गती येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### ➤ इच्छुकांची मोठी गर्दी

निवडणुकीच्या प्रक्रियेला मंगळवारपासून सुरुवात झाली असून महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वार, इमारतीचे प्रवेशद्वार तसेच दुसऱ्या व अकराव्या मजल्यावरील सहा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालय बाहेरील गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस कर्मचाऱ्यांकडून इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांना नियमानुसार आत प्रवेश देत असल्याचे दिसून आले.

## दोन्ही 'राष्ट्रवादी काँग्रेस' २६ डिसेंबरला एकत्र येणार?



### • सुप्रिया सुळेंनी स्पष्टच सांगितलं 'माझ्याकडे अद्याप कोणताही औपचारिक प्रस्ताव आलेला नाही,'

वृत्तसंस्था । पुणे

नगर परिषद निवडणुकांमध्ये भाजपसह महायुतीला मिळालेल्या यशानंतर राज्यातील राजकीय वर्तुळात मोठ्या हालचालींना वेग आला आहे. २६ डिसेंबरला दोन्ही 'राष्ट्रवादी' पुन्हा एकत्र येणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला असतानाच, खासदार सुप्रिया सुळे यांनी यावर महत्त्वाची भूमिका मांडली आहे. 'माझ्याकडे अद्याप कोणताही औपचारिक प्रस्ताव आलेला नाही,' असे स्पष्ट करत सुळेंनी सस्पेन्स कायम ठेवला आहे.

पुण्यात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, 'आघाड्या कशा करायच्या याबाबत अनेक पातळ्यांवर नेत्यांच्या चर्चा सुरू आहेत. जोपर्यंत ठोस काही हाती येत नाही, तोपर्यंत अधिकृत भाष्य करणे कठीण आहे. आमचा पक्ष लोकशाही पद्धतीने चालतो, त्यामुळे कोणताही निर्णय घेताना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केली जाईल.' पुण्याचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप आणि आपल्यात दोन तास चर्चा झाली असून विविध पर्यायांवर विचारमंथन सुरू (पान २ वर)

### • नातीगोती आणि कार्यकर्त्यांचे हित

**अजित पवार गटाशी होणाऱ्या चर्चेबाबत बोलताना त्या म्हणाल्या, 'अजित पवार आणि आमच्या लोकांच्या काही चर्चा नक्कीच सुरू आहेत. इतक्या वर्षांच्या ओळखी आणि नातीगोती आहेतच. शेवटी या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांना आणि पुणेकरांना केंद्रबिंदू ठेवूनच विकासाच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घेतला जाईल.'**

# कुंभमेळा भूसंपादनाचा तिढा अखेर सुटणार?

### • शेतजमीन संपादित करताना कुणावरही अन्याय होणार नाही : मंत्री नरहरी झिरवळ मैदानात!

वृत्तसंस्था । नाशिक

**आगामी काळात नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. यानिमित्त देश-विदेशातील कोट्यावधी भाविक जिल्ह्यात येतील. या भाविकांसाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक तेवढ्याच शेतजमिनीचे संपादन करण्यात येईल. त्यातून जिल्ह्याचा विकासाला चालना मिळेल. शेतजमीन संपादित करताना कुणावरही अन्याय होवू नये, यासाठी राज्य शासनाची भूमिका सकारात्मक राहील, अशी ग्वाही अन्न व औषधमंत्री नरहरी झिरवळ यांनी दिली.**



**कुंभमेळा ज्या त्र्यंबकेश्वरमध्ये होणार आहे, त्या तालुक्यासह इगतपुरी व दिंडोरी हे आदिवासीबहुल तालुके आहेत. स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेण्यासाठी शासनाने आता या भागाचे प्रतिनिधित्व करणारे राज्याचे अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवळ आणि इगतपुरी-त्र्यंबकेश्वरचे आमदार हिरामण खोसकर यांना मैदानात उतरवले आहे.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात मंत्री झिरवळ यांच्या अध्यक्षतेखाली दिंडोरी, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर या तालुक्यात विविध प्रकल्पांसाठी संपादित होणाऱ्या जमिनीबाबत शेतकऱ्यांबरोबर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस झिरवळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आमदार हिरामण खोसकर, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नवनाथ सोनवणे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

आगामी कुंभमेळ्यासाठी शहरासह ग्रामीण भागात विविध प्रकल्प, रस्ते, नाशिक परिक्रमा मार्ग आदी कामांसाठी वेगवेगळ्या भागात भूसंपादन करावे लागणार आहे. भूसंपादन प्रक्रिया रखडल्यास प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होणे अवघड बनू शकते. इगतपुरी-त्र्यंबकेश्वर रस्त्याच्या विस्तारीकरणास स्थानिकांतर्फे विरोध होत असून त्यांचे आंदोलनही सुरू आहे. कुंभमेळ्यास फारसा कालावधी नसल्याने प्रशासकीय पातळीवर भूसंपादनाला वेग देण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत मंत्री झिरवळ (पान २ वर)

### मद्रास हायकोर्टाकडून गृह मंत्रालयाचा आदेश रद्द

# भगवद् गीता, वेदांत, योगा धार्मिक नाही

वृत्तसंस्था । चैन्नई

**मद्रास उच्च न्यायालयाने नुकताच एक महत्वाचा निर्णय दिला आहे. भगवद् गीता, वेदांत, योगा धार्मिक नसल्याचा निर्णय मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे. या संदर्भातील केंद्रीय गृह मंत्रालयाचा आदेश देखील मद्रास उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. 'भगवद् गीता हे धार्मिक ग्रंथ नाही, तर ते एक नैतिक शास्त्र आहे. भारतीय संस्कृतीचा हा एक भाग आहे.**



**त्यामुळे त्याला कोणत्याही एका धर्माच्या चौकटीत मर्यादित ठेवता येणार नाही', असं मद्रास उच्च न्यायालयाने म्हटलं आहे.**

तसेच भगवद् गीता आणि योगाचं शिक्षण देणाऱ्या ट्रस्टची 'फॉरेन कॉन्ट्रिब्युशन (रेग्युलेशन) ॲक्टच्या अंतर्गत नोंदणी नाकारण्याचा निर्णय मद्रास उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. न्यायमूर्ती जी.आर. स्वामिनाथन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. आर्ष विद्या गुरुकुल ट्रस्टला एफसीआरए नोंदणी नाकारण्याचा केंद्रीय गृह मंत्रालयाचा निर्णय त्रुटींवर आधारित असल्याचं सांगत मद्रास उच्च न्यायालयाने रद्द केला आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

केवळ भगवद् गीता आणि योगाचं शिक्षण देण्याच्या आधारावर (पान २ वर)

### श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तीन महिने दर्शनासाठी बंद

वृत्तसंस्था । नारायणगाव

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असणारे श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर हे विकास आराखड्याअंतर्गत विविध विकासकामे करण्यासाठी तीन महिने भाविकांना दर्शनासाठी बंद करण्याबाततचा निर्णय घेण्यात आला आहे. भीमाशंकर देवस्थान ट्रस्ट, स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आणि बैठकीचा अहवाल प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना सादर केल्यानंतर मंदिर बंद करण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडून काढणात येणार आहे.

# एआयमुळे एका वर्षात गेल्या ५५ हजार जणांच्या नोकऱ्या

## टेक इंडस्ट्रीवर ले ऑफचे संकट

वृत्तसंस्था । दिल्ली



एआय इतक्या वेगाने प्रगती करत आहे की, त्यामध्ये प्रत्येक क्षेत्रातील विविध प्रकारच्या पदांची जागा घेण्याची क्षमता असल्याचे मानले जात आहे. एआयच्या युगात कोणतीही नोकरी पूर्णपणे सुरक्षित राहिलेली नाही. याचेच प्रत्यक्ष उदाहरण २०२५ मध्ये टेक क्षेत्रात पाहायला मिळाले आहे. कृत्रिम तंत्रज्ञान (एआय) मुळे २०२५ मध्ये ५० हजारांहून अधिक लोकांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत. ॲमेझॉनसारख्या अनेक बड्या कंपन्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून काढले आहे. 'चॅलेंजर, ग्रे अँड ख्रिसमस' या कन्सल्टिंग (पान २ वर)

# उद्योजकतेला चालना दिल्यास गरिबीचे निर्मूलन

## इन्फोसिसचे संस्थापक आणि ज्येष्ठ उद्योगपती नारायण मूर्ती यांचे प्रतिपादन

वृत्तसंस्था । मुंबई

**उद्योजकतेला चालना दिल्यास भारतातील गरीबीचे निर्मूलन करता येऊ शकते. हा विचार केवळ सैद्धांतिक नसून प्रत्यक्ष प्रयोगातून यशस्वी ठरलेला आहे, असे प्रतिपादन इन्फोसिसचे संस्थापक आणि ज्येष्ठ उद्योगपती नारायण मूर्ती यांनी केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी १९८० च्या दशकातील प्रतिकूल परिस्थिती, त्या काळात घेतलेले धाडसी निर्णय आणि त्यातून भारताच्या आर्थिक प्रवासाला मिळालेली नवी दिशा यांचा आढावा उलगडला.**



कल्पनांचे रूपांतर नोकऱ्यांमध्ये आणि संपत्तीत झाले, तरच कर रूपाने सार्वजनिक कल्याण शक्य असल्याचे सांगताना, मूर्ती यांनी त्यांच्या आयुष्यात आलेल्या अडचणी व त्यांचा केलेला सामना विद्यार्थ्यांसमोर उलगडला. पॅरिसहून अमृतसरपर्यंत जवळपास ११ महिने प्रवास केला. दिवसाला तीन ते पाच डॉलर खर्च करत सामाजिक-आर्थिक स्थिती समजून घेतली आणि उद्योजकतेचा प्रयोग सुरू केला. त्या काळातील संगणक आयात करण्यासाठी दोन ते तीन वर्षे लागत. परवानग्यांसाठी दिल्लीला ४० ते ५० वेळा फेऱ्या माराव्या लागत.

बँका सॉफ्टवेअर उद्योगाला कर्ज देण्यास तयार नव्हत्या, कारण तारण नव्हते. शेअर बाजारात जाण्यासाठी 'कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यू'ची परवानगी आवश्यक होती. 'परिस्थिती अत्यंत कठीण होती; मात्र ध्येयावर ठाम विश्वास असेल, तर अडथळे पार करता येतात, असे त्यांनी सांगितले. १९८० च्या दशकात दूरध्वनी घेण्यासाठी ७ ते १० वर्षे प्रतीक्षा करावी लागत होती. संगणक, इंटरनेट, परकीय चलन व्यवहार, आयात-निर्यातप्रत्येक टप्प्यावर परवाने आणि सरकारी निर्बंधांचा अडथळा होता. अशा वातावरणात सॉफ्टवेअर कंपनी उभारण्याची कल्पनाच अनेकांना अवास्तव वाटत होती. मात्र, याच काळात उद्योजकतेचा प्रयोग हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले.

पहिल्या दोन वर्षांत भारतात संगणक नसतानाही कंपनी चालवली गेली. तरुण अभियंते अमेरिकेत (पान २ वर)

**उद्योजकांसाठी सांगितली तीन मूलभूत सूत्रे ग्राहकाला मिळणाऱ्या मूल्यावर लक्ष केंद्रित करा, कमी खर्चात बाजाराचा अभ्यास करा आणि समान मूल्यव्यवस्था असलेली विश्वासार्ह तुकडी उभी करा. 'किंमत नव्हे, तर मूल्य महत्त्वाचे असते; ग्राहक मूल्य आणि किंमत यांची तुलना करून निर्णय घेतो,' ही तीन मूलभूत सूत्रे त्यांनी उद्योजकांना दिली.**

### • राधाकृष्ण विखे यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट; लोकप्रतिनिधींची बैठक बोलवण्याची केली मागणी

# पुणे-नाशिक रेल्वेसाठी जुनाच मार्ग हवा!

वृत्तसंस्थत्त । राहाता

**पुणे-नाशिक जलदगती रेल्वे प्रकल्प जुन्या प्रस्तावित मार्गानेच कार्यान्वित करावा, ही लोकप्रतिनिधी आणि जनतेची भावना राज्य सरकारने केंद्रीय रेल्वे मंत्र्यांपर्यंत पोहोचवावी अशी विनंती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**

सन २०१९ मध्ये संगमनेर-अकोले मार्गे तयार करण्यात आलेल्या या रेल्वे मार्ग प्रकल्प अहवालावरच कार्यवाही करण्याची आग्रही मागणी त्यांनी केली.विखे यांनी आज, मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून पुणे -नाशिक रेल्वे मार्गाच्या, जिल्ह्यात निर्माण झालेल्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर भेट घेतली. विखे यांनी यापूर्वी या प्रकल्पाची वस्तुस्थितीही पत्राव्दारे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

## संपादकीय

### ॲग्री होमिओपॅथीचा नवा प्रवाह

मुळासकट आजाराचे उच्चाटन करण्यासाठी प्रभावी मानली जाणारी होमिओपॅथी उपचाराची पद्धत आता शेतीतही अंमलात आणली जात आहे. कृषी क्षेत्रात होमिओपॅथीचा यशस्वीपणे वापर केला तर अनेक समस्यांवर तोडगा काढणे शक्य होईल. ही पद्धत नजिकच्या काळात रासायनिक किटकनाशके आणि खताला पर्याय देणारी ठरू शकते. या माध्यमातून पिकांच्या उत्पादनात वाढ, किडीचा प्रार्दूभाव रोखणे आणि कृषी क्षेत्राचा सर्वंकष विकास करण्यासाठी उपयुक्त माध्यम ठरू शकते. भारतात यादृष्टीने अनेक संशोधन केले जात असून प्रयोगही केले जात आहेत. जाणकारांच्या मते, या पद्धतीत रोपट्यांना अंतर्गत रुपातून मजबूत करण्यावर भर दिला जातो. जेणेकरून नैसर्गिक रुपाने रोगराईचा मुकाबला करणे शक्य होते. कृषी होमिओपॅथीमुळे मातीत मिसळल्या जाणार्या रासायनिक खतांमुळे होणारे नुकसान टाळले जाते, मातीतील अवशेषांचा समूळ नायनाट होतो आणि शेवटी मातीची सुपिकता वाढण्यास मदत होते. महागड्या आणि पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत कमी असणारा खर्च. यामुळे कृषी क्षेत्रात होमिओपथीचा वापर हा नक्कीच क्रांतिकारी पाऊल ठरू शकतो. ॲग्री होमिओपॅथी रोपट्यांना सक्षम करण्याबरोबरच अंतर्गत प्रक्रिया देखील मजबूत करते. रोपट्यांची सर्वंकष वाढ होऊन ते नैसर्गिक रुपाने देखील आपोआप किडीचा सामना करण्यास सक्षम बनतात. या सुविधेमुळे महागड्या आणि गरजेच्या वेळी उपलब्ध न होणाऱ्या रासायनिक खतांचा वापर करण्याची गरज भासत नाही. एखाद्या आजाराला मुळासकट काढण्याचे काम होमिओपॅथी उपचार पद्धतीत आहे. तीच मात्रा इथेही लागू केली जाईल. हाच सिद्धांत माती आणि रोपट्यांना लागू होतो. होमिओपॅथी ही अनुवांशिक हालचाली आणि चयापचय म्हणजेच मेटाबालिज्मच्या बदलातील प्रक्रियेला प्रोत्साहित करून पिकांची प्रतिकार शक्ती वाढवण्यास मदत करते. कृषी क्षेत्रात होमिओपॅथी औषधांचा वापर अनेक दशकांपासून होत आहे आणि तो यशस्वीही ठरला आहे. मात्र त्याचा वापर मर्यादित आहे. पण आता यासंदर्भात जगभरात संशोधन वाढले असून लोकांना त्याविषयी जिज्ञासा वाढली आहे. एखादा रुग्ण होमिओपॅथी डॉक्टरकडे जातो तेव्हा त्याच्यावर परिणामकारक उपचार केले जातात आणि त्या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न होतो. हाच मार्ग कृषी क्षेत्राने देखील स्वीकारला आहे. यानुसार जागतिक पातळीवर होमिओपॅथीचे नवे रूप म्हणून ॲग्रो होमिओपॅथीकडे पाहता येईल आणि भविष्यात शेतीचे आरोग्य सुधारण्यासाठी एक सक्षम पर्याय म्हणून समोर येऊ शकेल. पाण्याच्या थेंबात सामावलेले होमिओपॅथी औषध हे शेती व शेतकऱ्यांसाठी आरोग्यदायी आणि उपयुक्त ठरू शकते. कमी खर्चाचे होमिओपॅथी औषध हे भविष्यात पानाफुलांवर अवलंबून असणार्या जीवजंतूंना देखील उपकारक ठरेल. रासायनिक पदार्थामुळे त्यांचा जीव गुदमरत असताना होमिओपॅथी औषध त्यांना जीवदान देण्याचे काम करेल. भारतात होमिओपॅथी औषधांच्या अनेक ठिकाणी चाचण्या झाल्या.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण उत्कृष्ट नागरिक बनविण्यास सहाय्यक

## • दीक्षांत समारंभावेळी राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेचे संचालक प्रा. गणेशन कन्नबीरन यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**प्रामाणिकपणा, अथक परिश्रम व विनम्रता हे तीन गुण विद्यार्थ्यांनी अंगीकारले तर त्यांना जीवनात यश हमखास मिळू शकेल त्याकरीता नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना उत्कृष्ट नागरिक बनविण्यास सहाय्यक ठरेल असे प्रतिपादन राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेचे संचालक प्रा. गणेशन कन्नबीरन यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट विद्यापीठात दीक्षांत समारंभात केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट विद्यापीठाचा ३४ वा दीक्षांत समारंभ मंगळवार दि. २३डिसेंबर रोजी उत्साहात संपन्न झाला. या समारंभात दीक्षांत भाषण करतांना प्रा. गणेशन कन्नबीरन बोलत होते. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सर्वश्री राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. साहेबराव भूकन, प्राचार्य जगदीश पाटील, प्राचार्य एस.आर. राजपूत, प्रा.जे.व्ही. साळी, प्राचार्य संजय सुराणा, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, नितीन झाल्टे, प्रा. महेंद्र रघुवंशी, डॉ.पवित्रा पाटील, डॉ. पराग मसराम, सीए रवींद्र पाटील हे उपस्थित होते.

प्रा. गणेशन कन्नबीरन पुढे बोलतांना म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे भारताची आताची शैक्षणिक प्रणालीत व उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावला आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील चौथी अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे आपण आता नोकरी शोधण्यापेक्षा नोकरी देण्यावर भर दिला पाहिजे. पारंपरिक शिक्षण पद्धती ही ज्ञानावर आधारित संकल्पना व सिद्धांतांवर भर देत असे आणि क्वचितच कौशल्य, नोकरी संशोधन व नवउपक्रमासाठी ज्ञान वापरण्याची क्षमता निर्माण करतील परंतु नवीन शैक्षणिक धोरणाने हा ट्रेंड बदललेला आहे. ज्यामध्ये प्रॅक्टिकल ओरिएंटेशन, फील्डवर्क आंतरवासियताच्या माध्यमातून व वास्तविक जगातील समस्यांवर आधारित प्रकल्प इत्यादीवर भर दिलेला आहे.

आजच्या काळात नोकऱ्या हया केवळ शैक्षणिक पात्रतेपेक्षा कौशल्यांशी अधिक प्रमाणात जोडल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे नोकरीसाठी आवश्यक कौशल्यांचा विकास हा अभ्यासक्रम रचना व अंमलबजावणीचा अविभाज्य भाग असणे गरजेचे आहे. नोकरीचे कौशल्य मुख्यत्वे दोन प्रकारचे असतात सॉफ्टस्किल व हार्डस्किल, हार्डस्किल मध्ये निवडलेल्या अभ्यासक्रमांशी संबंधित मूलभूत विषयक कौशल्यांवर लक्ष केंद्रित करतात तर सॉफ्टस्किल हे हार्डस्किल्सना पूरक व सहाय्यक असतात. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ बौद्धिक विकासापुरते मर्यादित नसून चारित्र्य घडविणे आणि सर्वांगीण संतुलित माणसे घडविणे हेही आहे.

## जिल्हा क्रीडा पुरस्काराकरिता मुदतवाढ

प्रतिनिधी । जळगाव

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणेअंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगावव्दारा जिल्हयातील उत्कृष्ट खेळाडू (१ महिला, १ पुरुष, १ दिव्यांग खेळाडू) गुणवंत क्रीडा मार्गदर्शक १ यांच्या कार्याचे, योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व क्रीडा क्षेत्रास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २००२ पासून देण्यात येतो. खेळाडू पुरस्काराकरिता १ जुलै २०२० ते ३० जून २०२५ पर्यतची कार्य ग्राहय धरले जाईल.

# जिल्ह्यातील ३२५२ अंगणवाड्या झाल्या चकाचक

## • अंगणवाड्यांसाठी विशेष स्वच्छता मोहीम यशस्वी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रे व त्यांचा परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी राहावा तसेच लहानग्या बालकांना स्वच्छ वातावरणात बाल्यावस्थेतील धडे घेता यावेत, या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून १५ ते २० डिसेंबर या कालावधीत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.**



या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील एकूण ३४३५ अंगणवाडी केंद्रांपैकी ३२५२ अंगणवाड्या व त्यांचा परिसर स्वच्छ करण्यात आला. अंगणवाडी परिसरातील स्वच्छतागृहे व्यापक प्रमाणात स्वच्छ करण्यात आली असून स्वच्छतेबाबत जनजागृतीही करण्यात आली. या मोहिमेमुळे बहुसंख्य अंगणवाड्या चकाचक झाल्या आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत स्वच्छतेचा वार सोमवार ही अभिनव संकल्पना राबविली होती. या संकल्पनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील ग्रामपंचायती, गावे तसेच पंचायत समिती स्तरावर विशेष स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्येही स्वच्छता उपक्रम घेण्यात आले.

अंगणवाडी स्तरावर अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या माध्यमातून ही विशेष स्वच्छता मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात आली. महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंत भदाणे यांनी या मोहिमेचे नियोजन केले. बालविकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका व मदतनीस यांच्या सक्रिय सहभागामुळे मोहीम यशस्वी ठरली. या स्वच्छता मोहिमेमुळे अंगणवाड्यांमधील वातावरण अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी बनले असून बालकांच्या सर्वांगीण विकासाला पूरक वातावरण निर्माण झाले आहे.

तालुकानिहाय स्वच्छ करण्यात आलेल्या अंगणवाड्यांची संख्या पुढीलप्रमाणे - अमळनेर - २१०, भडगाव - १५५, भुसावळ - १४९, बोदवड - ७८, चाळीसगाव - ३५०, चोपडा - २९१, एरंडोल - १५४, धरणगाव - १५९, जामनेर - ३०३, जळगाव - २१८, मुक्ताईनगर - १६८, पाचोरा - २७७, पारोळा - १९८, रावेर - २९८, यावल - २४४.

## रुक्मिणी फाउंडेशनतर्फे गरजूंना स्वेटर वाटप

प्रतिनिधी । जळगाव

रुक्मिणी फाउंडेशन मिडटाऊनतर्फे गरजू मुलांना अलीकडेच सोमाणी शाळेत स्वेटर वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून दूध संघाचे संचालक अरविंद देशमुख, गोदावरी फाउंडेशनच्या संचालिका डॉ. केतकी पाटील, जितेंद्र जैन, प्रदीप लोढा उपस्थित होते. सूत्रसंचालन पंकज जैन यांनी केले. अध्यक्ष राजीव श्रॉफ यांनी आभार मानले. रवींद्रसिंह राजपूत, योगेश निंबाळकर, अल्पेश कोठारी, विजय सांखला, गणेश फुसेकर, राहुल चौधरी उपस्थित होते.

## पान १ वरुन

**जळगाव महापालिकेसाठी......**

दिसून आले. अनेकांनी सकाळीच अर्ज घेण्यासाठी इच्छुक उमेवारांनी कार्यकर्त्यांसह महापालिकेच्या इमारती समोर सकाळी दहा वाजता उपस्थित होते. त्यामुळे महापालिकेच्या इमारती समोरील मुख्य रस्त्यापर्यंत गर्दी झालेली होती. त्यामुळे पोलिसांनी तगडा बंदोबस्त प्रवेशद्वार लावण्यात आला होता. तर अनेक इच्छुक उमेदवारांची ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी धावपळ सुरू असल्याची चित्र महापालिकेच्या विविध विभागात दिसून येत होती.

**दोन्ही 'राष्ट्रवादी' २६......**

असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाविकास आघाडीचे काय? - राज्यातील महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत सुळे यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. 'मुंबईत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाशी आमची चर्चा सुरू असून जागावाटप अंतिम टप्प्यात आहे. आमचा प्रयत्न दोन्ही ठाकरे बंधू, काँग्रेस आणि आम्ही सर्वांनी एकत्र लढण्याचा आहे,फ्फ़असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चेवर भाष्य करताना, 'ठाकरे बंधूंची युती होणे ही बाळासाहेब ठाकरेंना सर्वात मोठी आदरांजली ठरेल,' असेही त्या म्हणाल्या. अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन - प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिल्याच्या चर्चांवर सुप्रिया सुळे यांनी पूर्णविराम दिला. 'प्रशांत जगताप यांनी कोणताही राजीनामा दिलेला नाही. कोणी खोट्या बातम्या पसरवल्या मला माहीत नाही,' असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. २६ डिसेंबरच्या मुहूर्ताबाबत अद्याप संभ्रम असला तरी, सुप्रिया सुळे यांच्या विधानामुळे राजकीय चर्चेला नवी फोडणी मिळाली आहे.

**कुंभमेळा भूसंपादनाचा......**

यांनी भूसंपादनात राज्य शासन शेतजमिनीचे भूसंपादन करताना कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही. त्यांना योग्य तो देय मोबदला देण्यासाठी प्रयत्न केले जातील असे नमूद केले. याबाबत शेतकऱ्यांना अद्ययावत माहिती जिल्हा प्रशासनाने द्यावी. त्यामुळे शेतकऱ्यांनी भूसंपादनासाठी सकारात्मक भूमिका घेऊन जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. आमदार खोसकर यांनी विविध सूचना केल्या. जिल्हाधिकारी प्रसाद यांनी कुंभमेळ्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

**भगवद् गीता, वेदांत,......**

कोणत्याही ट्रस्टला एफसीआरए नोंदणी नाकारता येणार नाही, असं स्पष्ट करत न्यायालयाने केंद्रीय गृह मंत्रालयाचा आर्ष विद्या गुरुकुल ट्रस्टला एफसीआरए नोंदणी नाकारण्याचा आदेश फेटाळून लावला. तसेच फक्त भगवद् गीता शिकवली जाते म्हणून एखाद्या संस्थेला धार्मिक ठरवणं चुकीचं असल्याचंही न्यायालयाने म्हटलं आहे. दरम्यान, २०२१ मध्ये या ट्रस्टने नोंदणीसाठी अर्ज केला होता. मात्र, त्यानंतर त्या अर्जावर थेट ऑक्टोबर २०२४ मध्ये प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. त्यामुळे यावरूनही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आणि अधिकाऱ्यांनी निष्पक्षपणे वागणे अपेक्षित असून सुशासनाचं ते एक प्राथमिक तत्व असल्याचं म्हटलं आहे. आर्ष विद्या ट्रस्टने कायद्याअंतर्गत नोंदणीच्या निर्णयासाठी न्यायालयाच्या हस्तक्षेपाची मागणी करणारी याचिका दाखल केली होती. तसेच दोन कारणांवरून हा अर्ज फेटाळला होता. यापैकी पहिलं कारण म्हणजे, याचिकाकर्त्यांनी पूर्वपरवानगीशिवाय परदेशी निधी मिळाला होता आणि परदेशी निधी दुसऱ्या संस्थेला देणगी म्हणून हस्तांतरित करण्यात आला आणि दुसरे कारण म्हणजे संस्थेचं स्वरूप धार्मिक दिसून आल्याचं कारण सांगत केंद्रीय गृह मंत्रालयाने हा अर्ज फेटाळून लावला होता. त्यानंतरया निर्णयाविरोधात मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

**उद्योजकतेला चालना दिल्यास......**

जाऊन प्रणाली तयारी करत, तर भारतात परवाने आणि भांडवलासाठी प्रयत्न सुरू होते. पहिला ग्राहक मिळवताना भारतीय अभियंत्यांची मेहनत, तांत्रिक समज आणि विश्वासार्हता हेच भांडवल ठरले. १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतर चित्र बदलले. परकीय चलन व्यवहार सुलभ झाले, परवाना राज संपुष्टात आला आणि 'कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यू' कार्यालय रद्द झाले. बँकांनी कार्यकारी भांडवल देण्यास सुरुवात केली. 'भारत तेव्हा अवघ्या दोन आठवड्यांत दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता. त्यामुळेच सुधारणा अपरिहार्य ठरल्या आणि इन्फोसिससारख्या कंपन्यांना भरारी घेता आली, असे मूर्ती म्हणाले. त्या काळात ९७ टक्के उत्पन्नकर, संपत्तीकर आणि समाजवादी मानसिकतेमुळे उद्योगपतींकडे संशयाने पाहिले जात असे. आज उद्योगपती हे आदर्श मानले जात आहेत. ही मानसिकता बदलणे हाच देशाचा मोठा विजय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. १९८१ मध्ये संगणक आणि इंटरनेट नसतानाही सॉफ्टवेअर कंपनी उभी राहू शकली, तर आजच्या काळात संधी अधिक आहेत. मात्र, संघर्ष अटळ आहे, हे वास्तव स्वीकारूनच पुढे जावे लागेल, असा सल्ला ही त्यांनी दिला.

**टेक इंडस्ट्रीवर ले......**

फर्मच्या आकडेवारीनुसार, यावर्षी अमेरिकेत झालेल्या जवळपास ५५ हजार नोकर कपातीसाठी एआय जबाबदार आहे. २०२५ मध्ये आतापर्यंत एकूण ११.७ लाख नोकऱ्या कमी झाल्या आहेत. २०२० मधील कोविड-१९ महामारीनंतर (जेव्हा २२ लाख नोकर कपातीची घोषणा झाली होती) ही सर्वात मोठी आकडेवारी आहे. चॅलेंजरच्या मते, ऑक्टोबरमध्ये अमेरिकन कंपन्यांनी १ लाख ५३ हजार नोकर कपातीची घोषणा केली. तर नोव्हेंबरमध्ये ७१ हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढले. नोव्हेंबरमधील ६ हजाराहून अधिक नोकऱ्या एआयमुळे गेल्याचे सांगण्यात आले आहे. वाढती महागाई, टॅरिफमुळे वाढलेला खर्च आणि कंपन्यांची खर्च कमी करण्याची धडपड सुरू असताना, एआयचे कारण पुढे करत कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढण्यात येत आहे.

## ला. ना. विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

प्रतिनिधी । जळगाव

ला. ना. शाळेतील १९७६-७७ च्या १० वी ड वर्गातील विद्यार्थ्यांच्य स्नेहमेळावा अलीकडेच शाळेत पार पडला. याप्रसंगी शाळेतील आठवणींना उजाळा देण्यात आला. अविनाश विसपुते, बापू पाटील राजेंद्र आगीवाल यांनी विविध गीते याप्रसंगी सादर केली. कार्यक्रमाल मुरलीधर पाटील, शशी बियाणी, आनंद मल्हारा, भालचंद्र खोतकर, प्रफुल्ल चौधरी, अरुण पाटील, राजेंद्र बोथरा कैलास मुंगड, दिलीप आगीवाल, सुनील भावसार, मोहन बडगुजर, वासुदेव वाणी दिलीप पाटील, अविनाश विसपुते, संतोष टेंभुर्णीकर, जगदीश देवरे, जगदीश चौधरी, सुनील पालवे, दिनेश चौरसिया आदी उपस्थित होते.

# नर्सिंगच्या ९७ विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात

## • शासकीय परिचर्या महाविद्यालय, जळगाव येथे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव संलग्नित शासकीय परिचर्या महाविद्यालयातील बीएससी नर्सिंगच्या पहिल्या बॅचचा लॅम्प लाइटिंग आणि शपथविधी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. प्रथम वर्षात नवप्रवेशित ९७ विद्यार्थ्यांनी यावेळी मानवतेच्या सेवेची शपथ घेतली.**



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सरस्वती देवी आणि नर्सिंग क्षेत्राच्या जनक फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. गिरीष ठाकूर होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत सोलंके, विशेष अतिथी म्हणून गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या प्रा. विशाखा गणवीर आणि प्रा. पियुष वाघ उपस्थित होते. प्राचार्य डॉ. पुष्पेंद्र निकुंभ यांनी विद्यार्थ्यांना सेवा, करुणा आणि प्रामाणिकपणाची शपथ दिली. अधिष्ठाता डॉ. गिरीष ठाकूर यांनी, नर्सिंग हा केवळ व्यवसाय नसून ती एक पवित्र जबाबदारी आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

नर्सिंग क्षेत्राची धुरा सांभाळणाऱ्या या भावी योद्ध्यांनी फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या साक्षीने रुग्णसेवेची आणि निष्ठेची शपथ घेतली. या सोहळ्याला डॉ. महादेव गायकवाड (उपप्राचार्य), डॉ. हितेश अड्चित्रे, डॉ. विलास १मालकर, अधिसेविका संगीता शिंदे, सहायक अधिसेवक तुषार पाटील, प्राचार्य कविता नेतकर, बबीता वैद्य, अक्षय आणि नीलेश तेली यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्नील पीठलोड व प्रा. रेबेका लोंढे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सागर मसने यांनी मानले.

# महापालिकेत शिंदे सेना स्वबळावर लढण्याची शक्यता?

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्यात नुकत्याच जाहीर झालेल्या नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांच्या निकालांनी जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये महत्त्वाचा बदल होण्याचे संकेत दिले आहेत. या निवडणुकांमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने अनेक ठिकाणी अपेक्षेपेक्षा अधिक यश मिळवत आपली स्वतंत्र ताकद अधोरेखित केली आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी शिंदे गटाने कोणतीही युती न करता स्वबळावर निवडणूक लढवली, त्या ठिकाणी पक्षाला मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे.**




नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांतून मिळालेल्या या यशामुळे शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचा वाढता प्रभाव लक्षात घेता, आगामी जळगाव महानगरपालिका निवडणुकीतही शिवसेना शिंदे गट स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. महापालिकेच्या निवडणुकीत स्वबळावर उतरण्याचा निर्णय झाल्यास विद्यमान राजकीय समीकरणांवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो.

स्थानिक पातळीवर पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत होत असून, कार्यकर्त्यांचे जाळे अधिक सक्रिय झाले आहे. त्यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोकप्रियता आणि विकासाभिमुख नेतृत्वाची प्रतिमा याचा लाभ पक्षाला होऊ शकतो, असा अंदाज राजकीय निरीक्षकांकडून वर्तवला जात आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागात मिळालेल्या यशाचा सकारात्मक परिणाम शहरी मतदारांवरही होऊ शकतो, असेही बोलले जात आहे. दरम्यान, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाकडून आढावा बैठका, संघटन मजबूत करण्यासाठी संपर्क मोहिमा आणि संभाव्य उमेदवारांची चाचपणी सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. युतीच्या गणितांपेक्षा स्वबळावर निवडणूक लढवणे अधिक फायदेशीर ठरेल, अशी भूमिका पक्षाच्या अंतर्गत चर्चांमध्ये पुढे येत आहे. जर शिवसेना शिंदे गटाने जळगाव महापालिकेत स्वतंत्र लढ्याचा निर्णय घेतला, तर शहरातील राजकारणात मोठ्या उलथापालथी घडण्याची शक्यता असून, आगामी निवडणूक अधिक चुरशीची होणार हे निश्चित मानले जात आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# शिवसेनेच्या रत्ना रघुवंशी सलग पाचव्यांदा नगराध्यक्ष

## शिवसेनेच्या रॅलीने वेधले लक्ष; घोषणाबाजी, ढोल–ताशांचा गजर

प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील पालिकेच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर लोकनियुक्त नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी यांनी आज नगराध्यक्ष पदाचा कार्यभार प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल वाघ यांच्याकडून स्वीकारला. तत्पूर्वी निघालेल्या रॅलीत शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करीत जल्लोष साजरा केला. नंदुरबार जिल्ह्यातून सलग पाचव्यांदा मोठ्या मताधिक्यांनी विजय होत.**






नगराध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळणाऱ्या रत्ना रघुवंशी या एकमेव नगराध्यक्ष ठरल्या आहेत. नगरपरिषदेचा निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या मतदानाची मतमोजणी रविवार २१ डिसेंबर रोजी करण्यात आली. यात नगराध्यक्षपदासह ४१ सदस्यांपैकी पैकी २९ जागांवर शिवसेनेने दणदणीत विजय संपादन केला. नंदुरबारकरांनी पुन्हा एकदा शिवसेना संपर्कप्रमुख आ. चंद्रकांत रघुवंशींच्या हातात सत्ता देऊन पालिकेचे नेतृत्व करण्याची संधी दिली.

सोमवार दि. २२ डिसेंबर रोजी नवनियुक्त नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी यांनी मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल वाघ यांच्याकडून कार्यभार स्वीकारला.

यावेळी आ. चंद्रकांत रघुवंशी, माजी आ. शिरीष चौधरी, ज्येष्ठ नेते प्रा.डॉ रवींद्र चौधरी, युवा नेते डॉ. विक्रांत मोरे यांनी सत्कार केला.

रत्ना रघुवंशी यांनी पदभार स्वीकारताच पालिकेच्या आवारात ढोल ताशांच्या गजर करीत आतिशबाजी करण्यात आली. यावेळी नगरसेवक, शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ➤ रॅलीने वेधले लक्ष; ढोल ताशांच्या गजर

सकाळी ११ वाजता आमदार कार्यालयापासून पालिकेपर्यंत शिवसेनेतर्फे रॅली काढण्यात आली. पारंपारिक वाद्य, ढोल– ताशे आणि डीजेच्या तालावर शिवसैनिकांनी ठेका धरला. रॅलीच्या अग्रभागी नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी यांच्यासह महिला नगरसेविका होत्या. त्यापाठोपाठ आ. चंद्रकांत रघुवंशी, माजी आ. शिरीष चौधरी, ज्येष्ठ नेते प्रा. डॉ रवींद्र चौधरी, युवा नेते डॉ. विक्रांत मोरे यांच्यासह नगरसेवक व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पालिकेच्या उंबऱ्याला नतमस्तक

नगरपरिषद म्हणजे नागरी जीवनाच्या आधारस्तंभ असून शहरातील जनतेला सोयी सुविधा उपलब्ध करून देणारी संस्था आहे. या संस्थेत जनतेने सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने नगराध्यक्ष रत्ना रघुवंशी यांच्यासह नगरसेवकांनी पालिका इमारत प्रवेशद्वाराचा उंबऱ्याला नतमस्तक करून आत प्रवेश केला.

## थोडक्यात

### प्रभागनिहाय मतदार यादी २८ रोजी प्रसिद्ध होणार

**धुळे** । महापालिका निवडणुकीसाठी अंतिम प्रभागनिहाय मतदार यादी २८ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होणार असून, त्यापूर्वीच दुबार मतदारांकडून ते कोणत्या प्रभागात मतदान करणार, याचे लेखी हमीपत्र भरून घेण्याचा प्रयत्न प्रशासनाचा आहे. एकाच मतदाराचे नाव दोन प्रभागात असल्यास होणारा गोंधळ आणि गैरप्रकार टाळण्यासाठी ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. आगामी निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. २३ डिसेंबरपासून निवडणूक अर्ज भरण्यास सुरुवात झाली तर २८ डिसेंबर रोजी प्रभागांनुसार अंतिम मतदार यादी जाहीर केली जाईल. अंतिम यादी प्रसिद्ध होण्यापूर्वीच दुबार मतदारांची ओळख पटवून त्यांच्याकडून निश्चिती करून घेतली जाणार आहे. तरीही प्रक्रियेतून कोणी राहून गेल्यास, अशा मतदारांना मतदानाच्या दिवशी थेट मतदान केंद्रावरही आपले हमीपत्र भरून देता येईल.

### नमामि सातपुडा मिशनचा गौरव

**बोरद** । नंदुरबार जिल्ह्यात जलसाक्षरता समिती अक्राणी आणि नमामि सातपुडा मिशन हे उपक्रम लोकसहभागातून राबवून जलसंवर्धनाचे कार्य करणाऱ्या प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांना जलप्रहरी–२०२५ हा पुरस्कार दिल्ली येथे देण्यात आला. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. डॉ. एच. एम. पाटील यांच्यावतीने भरत पावरा, सुनील परमार, ॲड. संगीता एच. पाटील व निरुपम पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सातपुड्यातील दुर्गम भागात लोकसहभाग व श्रमदानातून २१ ठिकाणी वनराई बंधारे उभारण्यात आले. यामुळे २२५ पेक्षा अधिक एकर शेतीचे सिंचन झाले होते. या कार्यामुळे हा पुरस्कार देण्यात आला.

### बिबट्याचा वावर; कामावर परिणाम

**अक्कलकुवा** । तालुक्यातील टिमकमौली येथे एकाच रात्रीत चार बिबट्यांनी गोठ्यातील पाच शेळ्यांना ठार केल्याची गंभीर घटना १० दिवसांपूर्वी घडली होती. चारही बिबट्यांचा याच भागात संचार आहे. यामुळे शेतीकामांवर परिणाम होत आहे. वनविभागाने पिंजरे लावले आहेत. परंतू अद्याप त्यात बिबट्या जेरबंद झालेला नाही. वनविभागाकडून पिंजऱ्यांची जागा बदलण्याची प्रक्रिया करुनही बिबट्या हाती आलेला नाही. दरम्यान शेतशिवारात मात्र बिबट्यांच्या पावलांचे ठसे दिसून येत आहे.

# शेतमाल चोरी करणारी टोळी अटकेत

## ➜ ९ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त; ७ गुन्ह्यांची उकल



प्रतिनिधी । धुळे

**साक्री पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत साक्री व पिंपळनेर पोलिस ठाणे हद्दीतील शेतातून कापूस, सोयाबीन व बाजरी चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद केले. आरोपींकडून एकूण ९ लाख ८५ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे.**

शेतकऱ्यांच्या शेतातून कापूस, सोयाबीन व बाजरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी दिले होते. त्यानुसार साक्री पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेचे संयुक्त पथक स्थापन करण्यात आले. उपविभागीय पोलिस अधिकारी संजय बांबळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार व साक्रीचे पोलीस निरीक्षक दीपक वळवी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू केला. साक्री पोलिसात दाखल गुन्ह्यातील एक आरोपी सिन्नर (जि. नाशिक) येथे असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने सिन्नर येथे जाऊन सोन्या उर्फ सोनू निंवा भिल (रा. किरवाडे, ता. साक्री) यास बेलू (ता. सिन्नर, जि. नाशिक) येथून शिताफीने अटक केली. तपासादरम्यान सोनू भिल याने गुन्ह्याची कबुली देत त्याचे साथीदार विनोद गुलाब अहिरे (रा. मुल्हेर, ता. सटाणा, जि. नाशिक; ह.मु. कुडाशी, ता. साक्री), सागर अनिल मालचे, लक्ष्मण माणिक मालचे, राज संभाजी मालचे (रा. धाडणे, ता. साक्री) असल्याचे सांगितले. त्यानंतर उर्वरित आरोपींना पिंपळनेर ता. साक्री येथील चौफुली परिसरातून ताब्यात घेण्यात आले. आरोपींनी संगनमत करून पिकअप वाहनाचा वापर करत साक्री तालुक्यातील मालपूर, विजापूर, नांदवण, कावठे, बल्हाणे, विरखेल व धनेर येथील शेतकऱ्यांच्या शेतातून कापूस, सोयाबीन व बाजरी चोरी केल्याचे निष्पन्न झाले. ही कारवाई साक्री पोलिस ठाण्याचे सपोनि अनिल बागुल, विकास शेवाळे, पोसई प्रसाद रौदळ, महेश घायतड, पोहवा उमेश चव्हाण, पोकाँ नारायण चव्हाण, मयूर चौधरी, तुषार यांच्या पथकाने केली.

# बेकायदेशीर गर्भपात, गर्भलिंग निदान करणे कायद्याने गुन्हा : जिल्हाधिकारी विसपुते

## ● सोनोग्राफी केंद्र अथवा व्यक्तींची माहिती देण्याचे आवाहन

प्रतिनिधी । धुळे

**गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग निदान तंत्र कायदा अंतर्गत बेकादेशीरपणे गर्भपात व गर्भलिंग निदान करणे कायद्याने गुन्हा आहे. या कायद्याचे उल्लंघन करणारे सोनोग्राफी केंद्र अथवा व्यक्तींची माहिती देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.**

➤ जिल्ह्यात अवैधरित्या गर्भलिंग निदान व गर्भपात करणाऱ्या व करुन घेणाऱ्या व्यक्तींची माहिती द्यावी. अशी माहिती देणाऱ्याचे नाव गोपनिय ठेवून माहिती देणाऱ्या व्यक्तिंस १ लाख रुपयांचे बक्षिस देण्यात येईल. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत अवैधरीत्या गर्भपात किंवा लिंग चाचणी होत असेल तर १८००–२३३–४४७५ /१०४ या हेल्पलाईन क्रमांकावर तसेच संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात भाग्यश्री जिल्हाधिकारी विसपते यांच्या अध्यक्षतेखाली पीसीपीएनडीटीची बैठक संपन्न झाली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्ता देगांवकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन चित्तम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, मनपाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी, पीसीपीएनडीटी जिल्हा विधी समुपदेशक समितीच्या ॲड. मीरा माळी, यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी सह समितीचे सदस्य तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, धुळे जिल्ह्यात मुलीचा जन्मदर वाढविण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात याव्यात. तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी, सर्व आशा वर्कर, आरोग्य सेविका यांच्यामार्फत एएनसी ट्रॅकिंग करुन अहवाल सादर करावा. पीसीपीएनडीटी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करुन मुलींवर जन्मदर वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कडक कारवाई करावी.

# पीएसआयच्या गैरवर्तणुकीप्रकरणी कारवाईची मागणी

प्रतिनिधी । पिंपळनेर



साक्री पोलीस ठाण्यातील एका पीएसआयच्या गैरवर्तणुकी प्रकरणी साक्री तालुका पत्रकार संघटनेच्या समन्वयक समितीने धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांना निवेदन दिले. संबंधित अधिकाऱ्याचे निलंबन करून तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागणीला पिंपळनेर तालुका पत्रकार संघटनेनेही जाहीर पाठिंबा दिला आहे. निवेदनातून पीएसआय घायतड यांनी महेश पत्रकारांशी असभ्य वागणूक व शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वी उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस अधिक्षकांकडे निवेदन देऊनही ठोस कारवाई न झाल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यानुसार मंगळवारी साक्री तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण, त्यानंतर साक्री शहरात व्यापक जनआंदोलन करण्यात येणार असल्याचे संघटनेने जाहीर केले आहे. निवेदन स्वीकारतांना पालकमंत्र्यांनी प्रकरणाची माहिती घेऊन पोलीस अधीक्षकांशी तात्काळ संपर्क साधत कारवाईचे निर्देश दिल्याचे सांगण्यात आले. निवेदन देताना साक्री तालुका मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रा. नरेंद्र तोरवणे, कार्याध्यक्ष विजय भोसले, प्रेस क्लबचे संचाल आबा सोनवणे, पत्रकार जगदिश शिंदे, शैलेंद्र गादेकर, शरद चव्हाण, रतनलाल सोनवणे आदी उपस्थित होते.

# रेशनकार्डमुळे देशभरात कुठेही अन्नधान्य मिळणार

प्रतिनिधी । नंदुरबार

भारत सरकारच्या अन्न व सार्वजनिक वितरण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या एक देश एक रेशन कार्ड या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत पात्र शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना आता देशातील कोणत्याही राज्यात किंवा जिल्ह्यातील ई–पॉस (ई–पॉईंट ऑफ सेल) यंत्रणायुक्त रास्त भाव दुकानातून अन्नधान्य उचलण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. याबाबतची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार यांनी शासकीय प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश स्थलांतरित मजूर, कामगार, विद्यार्थी तसेच रोजगार व शिक्षणासाठी जिल्ह्याबाहेर किंवा राज्याबाहेर राहणाऱ्या कुटुंबीयांना अन्नधान्य मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करणे हा आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या मूळ शिधापत्रिकेवर मिळणारे अन्नधान्य सध्या वास्तव्यास असलेल्या ठिकाणी सहजपणे मिळू शकणार असल्याने अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी अन्नधान्य उचलताना आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. तसेच शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांचे आधार संलग्नीकरण व ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी संबंधित रास्त भाव दुकानदार, तहसील कार्यालय किंवा अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संपर्क साधावा, असेही जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार यांनी सांगितले आहे.

# सीसीआयच्या स्लॉट बुकिंग घोळावर शिवसेना आक्रमक

## शिंदखेड्यात जिनिंगला भेट; शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर शानाभाऊ सोनवणेंनी अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

प्रतिनिधी । शिंदखेडा

तालुक्यात कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) यांच्या ऑनलाईन स्लॉट बुकिंग व्यवस्थेतील गंभीर त्रुटी व कोणतीही पूर्वसूचना न देता मध्यरात्री करण्यात आलेल्या स्लॉट कॅन्सलेशनविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक झाली आहे. या प्रकारामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर शिवसेना जिल्हाप्रमुख शानाभाऊ सोनवणे यांनी सकाळी अकरा वाजता वर्धमान जिनिंग, शिंदखेडा येथे प्रत्यक्ष भेट देत सीसीआयचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाब विचारला.



शिंदखेडा तालुक्यातील सीसीआयमार्फत कापूस खरेदी करणाऱ्या सर्व जिनिंगमध्ये एकाचवेळी मध्यरात्री स्लॉट रद्द करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी डिजिटलदृष्ट्या असाक्षर असूनही संपूर्ण खरेदी प्रक्रिया केवळ ऑनलाईन पद्धतीवर अवलंबून ठेवण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दिवसभर शेतात कष्ट करून कापूस भरलेले ट्रॅक्टर घेऊन जिनिंगवर आल्यानंतर अचानक कोणतीही पूर्वसूचना न देता स्लॉट रद्द झाल्याचे संदेश मिळाल्याने ट्रॅक्टर भाडे, मजुरी, वेळ व इतर खर्च वाया जात असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. ही कॅन्सलेशन प्रक्रिया संशयास्पद असून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यामागे काही गोडबंगाल असल्याची तीव्र शंका शेतकरी व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. शेतकरी हा देशाचा पोशिंदा असून त्याचा अशा पद्धतीने छळ करणे अन्यायकारक व अमानवी असल्याचे प्रतिपादन शानाभाऊ सोनवणे यांनी केले. संबंधित अधिकाऱ्यांना कायदेशीर कारवाईची भीती उरलेली नसल्याचे या प्रकारावरून स्पष्ट होत असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी तालुका प्रमुख गिरीष देसले, सर्जेराव पाटील, रमेश बोरसे, माजी शहरप्रमुख नंदकिशोर पाटील, संजय पाटील, कपिल पाटील, शेतकरी जगदीश शिरसाठ, महेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

**या प्रकरणी तातडीचा तोडगा काढत सीसीआय अधिकाऱ्यांनी कंपनीला ई–मेल करून संबंधित शेतकऱ्यांचा कापूस दुपारी एक वाजेपासून ऑफलाईन पद्धतीने खरेदी करण्यात येईल, असे आश्वासन दिले. मात्र, भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती झाल्यास शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा देण्यात आला.**

# अपक्ष उमेदवाराच्या घरावर दगडफेक

## चाळीसगावात भाजपाचा उमेदवार पडल्याचा राग

प्रतिनिधी । चाळीसगाव

**नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उभे असलेले अपक्ष उमेदवार राकेश भिमराव बारसे यांच्या घरावर तुझ्यामुळेच आमचा उमेदवार पडला म्हणत, भाजपा शहराध्यक्षच्या कार्यकर्त्यांनी, काल नगरपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यानतंर बिअरच्या खाली बॉटल व दगड फेक केली. यात त्यांच्या घराचे नुकसान झाले आहे.**



याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, राकेश भिमराव बारसे हे चाळीसगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी प्रभाग क्र.३ मध्ये अपक्ष उभे होते. त्याच प्रभागात भाजपाचे शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक नितीन पाटील हे देखील उभे होते. न.पा.चा निकला लागला, त्यात राकेश बोरस व नितीन पाटील ह्या दोघांचा पराभव झाला. त्यामुळे नितीन पाटील याना मिळणारे मते रॉकेश बोरसे यांनाच मिळाल्याचा आरोप करत, नितीन पाटील यांचे कार्यकर्ते शिवराज पाटील पूर्ण नाव माहित नाही, रोहित चौधरी पुर्ण नाव माहित नाही, अजय राजपुत पुर्ण नाव माहित नाही, निलेश चौधरी पुर्ण नाव माहित नाही व ईतर पूर्ण नाव माहित नाही सर्व रा. चाळीसगाव अशा दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.४५ वाजेच्या सुमारास रोकश बोरसे यांच्या घरासमोर येवून तुझ्यामुळे आमचा नगरसेवक पदावर नितीन पाटील हे निवडून येणारे उमेदवार होते, तु अपक्ष का उभा राहिला, तुझ्यामुळे आमचे सिट पडलेले आहे असे बोलुन, शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.

**घरावर दगड व बिअरच्या बॉटल फेकून काचा तोडुन नुकसान केले. याप्रकरणामुळे शहरात एकच खळबळ उडली आहे. घटनास्थळी पोलिसांनी येवून पाहणी केली. याप्रकरणी रोकश बोरसे यांच्या फिर्यादीनूसार चाळीसगाव पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# आयुध निर्माणी केंद्रीय विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



प्रतिनिधी । भुसावळ

**येथील पीएम श्री केंद्रीय विद्यालयस मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरे करण्यात आले.**

कार्यक्रमाची मुख्य संकल्पना संवैधानिक मूल्यांचे जतन ही होती, ज्याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही मूल्ये रुजवणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे निरंजन लाल (कार्यकारी संचालक, ओ. एफ. भुसावळ आणि अध्यक्ष, व्हीएमसी), ए. एस. गोगाटे (संयुक्त महाव्यवस्थापक, ओ. एफ. भुसावळ आणि नामनिर्देशित अध्यक्ष विद्यालय प्रबंधन समिती) आणि विद्यालयाचे प्राचार्य डी. एस. नंदेश्वर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. प्रसंगी प्राचार्य डी. एस. नंदेश्वर यांनी वार्षिक अहवाल सादर करून वर्षभरातील शैक्षणिक यश, सहशालेय उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेतला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शनाने उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये स्वागत नृत्य, शास्त्रीय नृत्य, ऊर्जावान महाराष्ट्रीयन लोकनृत्य, रंगतदार गुजराती आणि राजस्थानी नृत्य, देशभक्तीपर नृत्य, हिंदी कव्वाली, सोलो गाणी, संगीतमय वाद्यवृंद आणि सामूहिक लोकनृत्य यासह सामाजिक आणि संवैधानिक मूल्यांवर आधारित एका प्रभावी नाटिकेचा समावेश होता. समारोपप्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक करून विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात संवैधानिक मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. आभार ज्येष्ठ शिक्षक नितीन कुमार उपाध्याय यांनी मानले. स्नेहसंमेलन यशस्वीतेसाठी समन्वयक एम. एन. पाटील, मुख्याध्यापक सुरेश नरहिरे, संगीत शिक्षिका रजनी नागभिरे आणि सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# न्हावे ढोमणे ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी प्रदीप पाणमन यांची निवड

प्रतिनिधी । चाळीसगाव

**तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत न्हावे ढोमणे उपसरपंच प्रदीप उर्फ पप्पू जुलाल पाणमन यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.**



लोकनियुक्त सरपंच वासुदेव वाल्मीक खैरनार यांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्यांच्या पाठिंब्याने बिनविरोध निवड करण्यात आली. न्हावे ढोमणे या ग्रामपंचायतीचे हे निवडणूक झाल्यापासून तिसरे बिनविरोध उपसरपंच आहेत, याप्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी एच. आर. पाटील, माजी उपसरपंच किशोर साहेबराव गायकवाड, कल्पना विजय शेलार, सारजाबाई भगवान सोनवणे, नारायण पंढरीनाथ ठाकूर, ज्योती अनिल पगारे, प्रभाकर अशोक पाटील, कल्पना विजय शेलार आदि उपस्थित होते.

## थोडक्यात

### अंतुर्ली येथे सेंट्रल बँकेचा ११५ वा स्थापना दिवस साजरा

**मुक्ताईनगर ।** तालुक्यातील अंतुर्ली येथील सेंट्रल बँक मध्ये सर सोराबजी पोचखानवला यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांच्या आठवणी ताज्या करण्यात आल्या. सर सोराबजी पोचखानवला यांचा जन्म ९ ऑगस्ट १८८१ ला ब्रिटिश काळात मुंबई महानगरमध्ये एका पारसी परिवारात झाला होता. २१ डिसेंबर १९११ रोजी ५० लाख रुपयात ही सेंट्रल बँक ऑफ इंडियाची सुरुवात केली. ५० रुपयांचे ४० हजार शेअर देऊन एकाच साप्ताहामध्ये ७० अकाउंट ओपन करून दीड लाख रुपये जमा केले होते. अशा या महान व्यक्तीमुळे आज हे बँक शिखरावर पोहचली आहे.

### सुनसगाव परिसरात रब्बीचा हंगाम धोक्यात

**भुसावळ ।** सुनसगाव परिसरातील शेती शिवारातील रब्बी पिकाचा हंगाम पाटाच्या पाण्याअभावी जाणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. वराडसिम, बेलव्हाळ, सुनसगाव, गोजोरा, वांजोळा, गोंभी, साकेगाव या गावातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी उजव्या कालव्याला अजूनही पाणी सोडण्यात आले नाही. त्यामुळे या परिसरातील हरभरा, दादर, गहू या पिकांना पाण्याची गरज आहे.

# जिल्ह्यातील ३४.७४ टक्के ग्रामपंचायती सीसीटीव्हीच्या नजरेत

## ४०३ ग्रामपंचायतींना बसला 'तिसरा डोळा'

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियान मोठ्या प्रमाणावर प्रभावीपणे राबविण्यात येत असून, या अभियानांतर्गत ग्रामपंचायती समृद्ध व अधिक सक्षम करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. याच उपक्रमांचा एक महत्त्वाचा भाग म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या दूरदृष्टीतून ग्रामपंचायत कार्यालये तसेच गावांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.या मोहिमेत जिल्ह्यात ३४.७४ टक्के ग्रामपंचायती सीसी टीव्ही च्या नजरेत आल्या आहेत.**

मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानांतर्गत ग्रामपंचायती डिजिटल करणे, ग्रामपंचायतीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधा ऑनलाईन करणे, गावात जलतारा व शोषखड्डे तयार करून पाणी जिरविणे, वनराई बंधारे बांधणे, तसेच ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन मिळवून देणे असे विविध उपक्रम राबविले




जात आहेत. याच अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायत कार्यालये व ग्रामपंचायत हद्दीत सुरक्षितता आणि पारदर्शकता वाढविण्याच्या उद्देशाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.जिल्ह्यातील एकूण ११६० ग्रामपंचायतींमध्ये हे अभियान सुरू असून, आतापर्यंत ४०३ ग्रामपंचायत कार्यालये व ग्रामपंचायत हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यामुळे जिल्ह्यातील ३४.७४ टक्के ग्रामपंचायती या सीसीटीव्हीच्या ङ्गतिसऱ्या डोळ्याफ्व्या नजरेत आल्या आहेत.

सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे ग्रामपंचायत कार्यालयातील कामकाजावर प्रभावी देखरेख राहणार असून, गावातील सुरक्षितता वाढण्यास तसेच गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होणार आहे. आगामी काळात उर्वरित ग्रामपंचायतींमध्येही टप्प्याटप्प्याने ही मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या विषयावर बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल म्हणाल्या की,मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामपंचायती अधिक सक्षम, पारदर्शक व सुरक्षित करणे हा आहे. ग्रामपंचायत कार्यालये व ग्रामपंचायत हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यामुळे कामकाजात पारदर्शकता वाढेल, नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल तसेच गावपातळीवर सुरक्षिततेला बळ मिळेल. सध्या जिल्ह्यात ३४.७४ टक्के ग्रामपंचायतींमध्ये सीसीटीव्ही व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली असून, उर्वरित ग्रामपंचायतींमध्येही ही सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून ग्रामपंचायती अधिक स्मार्ट, उत्तरदायी व लोकाभिमुख करण्याच्या दिशेने जिल्हा परिषद सातत्याने प्रयत्नशील आहे.

# मोटारसायकलसह चांदीचे देव लंपास

प्रतिनिधी । अमळनेर

**घराचा कडी कोंडा तोडून अज्ञात चोरट्याने मोटरसायकल सह घरातील चांदीचे देव चोरून नेल्याची घटना कलागुरू ड्रीम सिटी मध्ये १९ रोजी रात्री घडली.**



प्रेमलता आबाजी पाटील यांच्या घराचा कडी कोंडा तोडून अज्ञात चोरट्याने चांदीच्या एकूण १२ तोळे वजनाच्या गणपती, महालक्ष्मी, शिव पार्वती, अन्नपूर्णा देवीची प्रत्येकी २१०० रुपये किमतीच्या अशा ६ हजार ४०० रुपयांच्या मुर्त्या, ७०० रुपये किमतीचे बाळकृष्ण देवांचा टोप, २८०० रुपये किमतीचे चांदीचे देवांचे शिक्के असलेले चांदीचे नाणे आणि ३५ हजार रुपये किमतीची मोटरसायकल असे एकूण ४६ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. महिलेच्या फिर्यादीवरून अमळनेर पोलीस स्टेशनला ३३१(३), ३३१ (४), ३०५, ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास एपीआय रवींद्र पिंगळे करीत आहेत.

# जयेश पाटील यांना 'खान्देश कृषी सम्राट पुरस्कार' प्रदान




प्रतिनिधी । चोपडा

पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था, चोपडा यांच्या वतीने आयोजित 'रंग-तरंग २०२५' या सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने कृषी क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणारे जयेश पाटील (रा. कुसुंबा, ) यांना खान्देश कृषिसम्राट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था ही गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याची परंपरा संस्थेने सातत्याने जपली आहे. याच परंपरेनुसार कृषी क्षेत्रातील मौलिक कार्याची दखल घेऊन जयेश पाटील यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा सत्कार समारंभ दि.२३ रोजी पंकज विद्यालय, बोरोले नगर, चोपडा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवर्ग, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्री. पाटील यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे आयोजन पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे सचिव व पदाधिकारी यांनी केले होते.

# निंभोरा येथे २६ रोजी जिल्हा महिला धम्म मेळावा

## • प्रा.अंजली आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी । निंभोरा

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जळगाव जिल्हा पूर्व महिला व पुरुष विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय महिला धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता निंभोरा बु. (ता. भुसावळ) येथील त्रिरत्न बुद्ध विहारात होणार आहे.



भुसावळ तालुक्यातील निंभोरा बु. (दीपनगर), फुलगाव, फेकरी, खडका, अकलूद, पंचशील नगर व कपीलनगर या सात ठिकाणी महिला उपासिका शिबिरे यशस्वीरीत्या पार पडली असून, या शिबिरांच्या सांगता समारंभाचे स्वरूप म्हणून सदर जिल्हास्तरीय महिला धम्म मेळावा आयोजित करण्यात येत आहे. तसेच गुरुवार दि. २५ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते सायं. ५ या वेळेत समता सैनिक दलाचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रियंका अहिरे (जिल्हाध्यक्षा, महिला विभाग) राहणार असून स्वागताध्यक्ष म्हणून सुमंगल अहिरे व रविंद्र अहिरे (जिल्हाध्यक्ष, जळगाव पूर्व) काम पाहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली सरदार व सुशिल हिवाळे करणार असून आभार प्रदर्शन प्रा. डॉ. संजीव साळवे करणार आहेत. मेळाव्यास प्रा. अंजली प्रकाश आंबेडकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहे. अनेक मान्यवर, केंद्रीय शिक्षक, महिला व पुरुष कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

धम्म चळवळ अधिक व्यापक व गतिमान करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मादणी शिवारातून लाखो रुपयांच्या वीजतारा चोरी

## • फत्तेपूर पोलिसांत अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल; एर्टिगासह कटर मशीन जप्त

प्रतिनिधी । जामनेर

**तालुक्यातील फत्तेपूर येथून जवळच असलेल्या लोणी गांवाजवळ मेघा इलेक्टीक कंपनीचे काम सुरू आहे. या कंपनीने वीज पोल गाडून त्यावर वीज तारा ओढण्याचे ठेका पारोळा येथील किरणदीप या खाजगी कंपनीला दिलेला आहे. किरणदीप कंपनीचा ठेकेदार गेल्या-१८ महिन्यापासून वीज खांब व वीज तारा ओढण्याचे काम करीत आहे. याच ठेकेदराचे मादणी गावाजवळ काम सुरू असतांना त्यांच्या कामावरून १२ वीज पोलवरील लाखो रुपयांच्या वीज तारा अज्ञात व्यक्तीनी चोरी केल्याची घटना घडलेली आहे. याबाबत फत्तेपूर पोलीस स्टेशनला अज्ञातां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.**

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, मेघा इलेक्ट्रीक कंपनी आणि महाराष्ट्र राज्य महावितरण निधुत कंपनी यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार मेघा इलेक्ट्रीक कंपनीचे लोणी ता. जामनेर गांवाजवळ काम सुरू आहे. मेघा कंपनीने वीज पोल गाडून उभे करणे व त्यावर वीज तारा ओढण्याचा ठेका पारोळा येथील किरण दीप कंपनीच्या विकास लोटन पाटील या खाजगी ठेकेदाराला दिलेला आहे. किरणदीप कंपनीचे काम गेल्या-१८ महिन्यांपासून सुरु आहे.



या कंपनीचे फत्तेपूर जवळील मादणी या गांवाजवळ शेतात वीज पोल गाडून वीज तारा ओढण्याचे काम सुरु होते. दि.१८ डिसेंबर रोजी कंपनीचे सहकारी अजय पाटील, सागर पाटील, पुलकेश पाटील हे मादणी गांवाजवळील सुरुअसलेल्या कामावर गेले असता. त्यांना त्याठिकाणी १२ वीज पोलवरील वीजतारा चोरी झाल्याच्या दिसून आल्या. तेव्हा त्यांनी आजूबाजूच्या शेतकऱ्यांना वीज ताराबाबत विचारपूस केली. तर कुठलीच माहिती मिळाली नाही. तेव्हा त्यांनी झालेल्या घटनेची माहिती किरणदीप कंपनीचे मालक विकास पाटील यांना दिली. विकास पाटील यांनी फत्तेपुर पोलीस स्टेशनला रितसर फिर्याद दिलेली आहे. त्यामध्ये त्यांनी १ लाख २० हजार किमतीची नवीन प्रकारच्या सुमारे १२ वीज पोलवरील २९७० मीटर लांबीची-१००- च्या उच्च दाबाच्या अल्यमीनीअमच्या वीज तारा अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचे म्हटले आहे. त्यांच्या या फिर्यादी वरून फत्तेपूर पोलीस स्टेशनला गु.र. नं. २१०/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कम ल-३०३ (२) प्रमाणे अज्ञात व्यक्तीच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

याप्रकरणी पोलिसांनी एम एच-१४ एम.टी.२३६५ क्रंमाकां ची चारचाकी पांढऱ्या रंगाची एर्टिगा गाडी व त्यामध्ये तार कट करण्याचे दोन मोठे कटर संशयीतरित्या गोद्री शिवारातून जप्त केलेली आहे. याबाबतचा तपास फत्तेपूर पोलीस स्टेशन चे सहा. पोलीस निरिक्षक अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक तुषार इंगळे हे करीत आहे.